# मृदग्रंध भाग- ३

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या बी.ए.तृतीय वर्षासाठी
(संत्र-५ व संत्र-६)
मराठी आवश्यक विषयाचे पाठ्यपुस्तक


संपादक मंडळ
अध्यक्ष
प्राचार्य- डॉ. गजानन जाधव
सदस्य
. मनोज तायडे,डॉ.केशव फाले, डॉ.काशिनाथ बऱ्हाटे, डॉ.राजेंद्र हावरे,
डॉ.अशोक कांबळे, डॉ.संतोष चव्हाण



प्रकाशक
राघव पब्लिशर्स अँन्ड डीस्ट्रीब्युटर्स
राजविलास टॉकिज जवळ
नागपूर / जबलपूर
ISBN-(मृदग्रंध भाग- ३)
९७८-९३-८३१३२-८२-९

# औदुंबर – बालकवी(१८९०-१९१८)

परिचय- बालकवी अर्थात त्र्यंबक बापुजी ठोंबरे हे मराठी काव्यक्षेत्रात निसर्गकवी म्हणून परिचय आहेत.१९०७ मध्ये जळगाव येथे भरलेल्या पहिल्या महाराष्ट्र कविसंमेलनामध्ये संमेलनाध्यक्ष डॉ.कान्होबा किर्तीकर यांनी ठोंबऱ्याना बालकवी ही पदवी बहाल केली. त्यांच्या फुलराणी, श्रावणमास, संध्यारजनी अशा काही कविता उल्लेखनीय आहेत. 'औदुंबर' ही त्यांची अशीच एक निसर्ग सुंदर कविता आहे.

# औदुंबर – कविता –

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळासावळा झरा वाहतो बेटांबेटांतून.

चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे ;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गर्दी पुढे

पायवाट पांढरी तयातून अडवी तिडवी पडे
हिरव्या कुरणांमधून चालली काळ्या डोहाकडे

झाकळुनी जळ गोड काळीमा पसरी लाटांवर
पाय टाकुणी जळांत बसला असला औदुंबर.

# कवितेचा अर्थ –

औदुंबर हे एक बालकवीने चीत्रिलेले शब्दचित्र आहे. हा औदुंबर म्हटला तर एक वृक्ष अन म्हटला तर एक नदीकाठी निसर्गरम्य परिसरात पाण्यात पाय टाकून बसलेला तत्वचिंतक आहे.

‘ ऐल तटावर पैल तटावर’ या ओळीने झुडपा-झुडुपातून वाहणाऱ्या निल्यासवळ्या झऱ्यांची ‘लय’ पकडण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. या वाहत्या झऱ्यांच्या दोन्ही किनाऱ्यावर हिरवळ आहे आणि बेटा-बेटातून वाहणारा हा झरा त्यात शोभून दिसत आहे.

दुसऱ्या कडव्यातून कवीने या ‘झऱ्यांची’ निसर्गसिद्ध पार्श्वभूमी वर्णन केलेली आहे. झऱ्यांच्या पलीकडे दूरवर चार घरांचे लहानसे गाव आणि त्याच्यापुढे शेतमाळ्यांची दाट झाडी शोभून दिसत आहे.

तिसऱ्या कडव्यातून दुसऱ्या कडव्यातील वर्णनंच पुढे सुरु असलेले दिसते.
चिमुकल्या खेड्यासमोरच्या दाट शेतमळ्यातून हिरव्या कुरणामध्ये आडवी – तिडवी पायवाट काळ्या डोहांपर्यंत पोहचलेली दिसते.

चौथ्या व शेवटच्या कडव्यात विशाल औदुंबराचे वर्णन आलेले आहे. औदुंबरांच्या पर्णछाया डोहातील पाण्यावर पडल्याने त्यावर वृक्षछायेचा गोड झाकोळलेला काळिमा भासमान होत आहे. आपले पाय डोहात बुडवून हा औदुंबर वृक्ष बसलेला आहे. एखादा चित्रकार या कवितेतून सुंदर निसर्ग – चित्र काढू शकेल असा तपशील इथे कवीने दिलेला आहे.

॥ धन्यवाद ॥

प्रा. सारिका पाचराऊत
डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्यालय, पातुर
मराठी विभाग